# प्रादेशिक नियोजनात लोकशाही आणि समाजवादी नियोजन म्हणजे एक विकास प्रकल्प.

**प्रा. डॉ. आचोले पी. बी.**

भूगोल विभाग

( आझाद महाविद्यालय औसा, ता. **औसा जिल्हा लातूर)**

**प्रा. दोरवे एस. आर.**

(सरस्वती संगीत कला महाविद्यालय लातूर)

९८२२७९८६५२

दीर्घकालीन उद्दिष्ट ठेऊन लघुउद्योग स्थापन केले जातात आणि जो मागासलेला प्रदेश आहे त्या प्रदेशात दीर्घकालीन नियोजन शासनाद्वारे केले जाते .देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी लघुउद्योग, अवजड उद्योग ,विकासाचा पाया घालतात

आणि हे प्रकल्प मोठ्या प्रमाणात विकास करण्यात उपयुक्त ठरतात व सामाजिक समस्यांचे निर्मूलन करता येते. राष्ट्र विकास आर्थिक विकास आणि शेती विकास, उत्पादन वाढ करून औद्योगिक उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पाठवता येतात . परिवहन ,रस्ते वाहतूक या घटकाच्या विकासातून आपली उद्दिष्टे साध्य करता येतात. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण व उपाय योजना करून कृषी क्षेत्र बदलून औद्योगिक विकासाचे क्षेत्र विकेंद्रित करून शिक्षण, आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आणण्यासाठी मदत होते . राष्ट्राच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रयत्न करता येतो पर्यावरणाचे संतुलन राखून याद्वारे नैसर्गिक उपलब्ध साधन संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी आणि मानवाला मूलभूत गरजा प्राप्त करून देण्यासाठी मानवाचे जीवन उंचावण्यासाठी प्रयत्न करता येतो.

भारतीय प्रदेशात स्वातंत्र्यपूर्व काळातही प्रशासनाला आर्थिक विकासाचे महत्त्व पटले त्यामुळेच स्वदेशी वापर करणे हे किती महत्त्वाचे आहे याची जाणीव स्वातंत्र्यसंग्राम काळातही एक फळी उभी केली गेली. आणि गरीब, मागासलेल्या देशाचा जलद विकास साधावयाचा असेल तर नियोजनाची कास धरली पाहिजे. त्यामुळे प्रादेशिक नियोजनासाठी "राष्ट्रीय नियोजन समिती" निर्माण करण्यात आली. कारण अशा अप्रगत देशात व समाजात प्रागतिक आणि विरोधी घटक एकाच वेळी कार्यप्रवण असतात. प्रागतिक विचार देणारे घटक मानवाचा सर्वांगीण विकास होऊन त्याचा फायदा मानवाला होतो. अधिक सुखी समृद्ध जीवन जगण्यासाठी होतो . तर विरोधी घटक मानवी व्यक्तिमत्त्वातील सर्जनशील ऊर्जा नष्ट करून प्रगतीचा मार्गच रोखून धरतात समाज ,व्यक्ती आणि देश यांचा विकास साधण्यासाठी समाजातील विविध प्रगतीच्या घटकांना एकाच दिशेने कार्यान्वित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न म्हणजेच नियोजन होय. कोणत्याही देशाच्या समस्यांची लढाई जिंकावयाची असेल तर पहिलाच हल्ला विचारपूर्वक जोशपूर्ण हवा. विरोधी घटकाला न जुमानता समाज प्रगतीच्या मार्गावर, न्याय या तत्वाने देश हित समोर ठेवून प्रादेशिक व राष्ट्रीय नियोजनाने जलद विकास साधला पाहिजे. सामान्य माणसांच्या नजरेत विकासाचा विचार भरला पाहिजे. मात्र राष्ट्रहित लक्षात घेतले नाही तर हळहळ आणि नकळत होणारा विकास जिरून जातो. आणि ज्या महापुरुषांनी विकास साधण्याचा प्रयत्न केला त्यांचा प्रयत्न असमर्थ ठरू शकतो.

 Copyright © 2020 Authors

नियोजनबद्ध आर्थिक विकास हा सामाजिक आणि आर्थिक बदल झपाट्याने घडून आणण्यासाठी मदत करू शकतो. हा विश्वास जनतेच्या मनात निर्माण झाला पाहिजे. यासाठी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात बदल अभिप्रेत आहेत ते जाहीरपणे जनतेसमोर कधी कधी मांडले पाहिजेत. यामुळे भारतीय प्रशासनाद्वारे नियोजनाचे चार उद्देश घोषित करण्यात आले.

**नियोजनाची उद्दिष्टे:**

(१) सर्व क्षेत्रातील उत्पादन जास्तीत जास्त वाढून राष्ट्रीय उत्पन्नाची आणि दरडोई उत्पन्नाची वरची पातळी गाठणे.

(२) देशात पूर्ण रोजगाराची व्यवस्था निर्माण करणे.

(३ ) उत्पन्न आणि संपत्ती यातील विषमता कमी करणे.

(४) भारतीय समाजाला सामाजिक न्याय प्राप्त करून देणे.

ही चारही उद्दिष्टे चार प्रकल्प नाहीत. एकाच ध्येयाशी निगडित अशा या प्रकल्पांना राबवताना एखादी गोष्ट घडून विकास साध्य करता येत नाही. असे पंचवार्षिक योजनेच्या प्रबंधात म्हटले आहे." सुयोग्य राजकीय-सामाजिक तत्वज्ञान यांची पार्श्वभूमी नसलेले नियोजन म्हणजे सुकानुविना जहाज" कारण असे विचारच लोकांची विकासा वृद्धीची ईर्षा निर्माण करतात केवळ तात्विक उद्दिष्ट घोषणा निरोपयोगी ठरतात. उच्च उद्दिष्ट समोर ठेवून आखलेली धोरण, कार्यक्रम ,यंत्र प्रणाली आवश्यक असते. प्रशासनात संवादी संघटन झाले नाही तर उद्दिष्टाच्या कल्पना पोकळ ठरतात . आणि प्रशासन, शासन यांच्यावरचा विश्वास नाहीसा होतो . म्हणजेच नियोजनबद्ध आर्थिक व सामाजिक बदल जलद घडवून आणणाऱ्या देशांनी दीर्घकालीन उद्दिष्टे ठरवून आपत्तीकालीन उद्दिष्टे आखणे गरजेचे आहे. मात्र ही उद्दिष्टे कितीही महत्त्वाची वाटली तरी हे दीर्घकालीन उद्दिष्टांवर कुरघोडी करणार नाहीत याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. आपत्तकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टाचा योग्य मेळ घालणे हेच तर नियोजन करण्याचे कार्य आहे. अशा रीतीने ज्या पद्धतीचा समाज निर्माण करावयाचा आहे त्याचे चित्र नियोजन करण्याच्या डोळ्यासमोर असली पाहिजे. आणि मानवी सर्वांगीण विकास साधला जाईल उत्पादन साधनांचे ,केंद्रीकरण उत्पादकाचे शोषण हे नफ्याचे उद्दिष्ट ठेवून वस्तू आणि सेवा यांच्या निर्मिती एऐवजी पैशाचीच वीन वाढविणारी भांडवली समाजरचना समाजाचे योग्य संघटन करण्याऐवजी विघटनाच्या मार्गाने या गोष्टीची जाणीव ठेवून समाजवादी समाजरचनेत खाजगी मालमत्ता ,उत्पादन साधनांची मालकी ,शासकीय मिरासदारीचा दबदबा संपूर्ण राष्ट्रीय करणावर आधारलेले नियोजन जलद गतीने होणारा विकास ,या गोष्टीवर भर दिला गेला परंतु 1917 सालाच्या क्रांतीनंतर मात्र मार्क्सवाद प्रत्यक्ष उतरविण्याचा पहिला प्रयत्न रशियामध्ये केला गेला . नियोजनबद्ध विकास कल्पना व नियोजन रशियामध्ये जन्माला आले रशियात मिळालेल्या यशामुळे भांडवलशाही देशावर, आर्थिक व्यवस्थेवर दूरगामी परिणाम झाला . खाजगी मालमत्ता व

 Copyright © 2020 Authors

मालकी यावर कायम श्रद्धा ठेवूनही दारिद्र्य ,दुःख अज्ञान ,आरोग्य या व्याधी दूर करण्यासाठी ,"जे जे होईल ते ते पहावे "ही भूमिका घेण्याऐवजी देशाच्या शासनाला काही विधायक भूमिका घेतली पाहिजे. खुल्या स्पर्धा असलेल्या बाजारात विकास हेतूने जनकल्याणाचा समतोल साधला पाहिजे . याची जाणीव भांडवलशाही असलेल्या सरकारांना ही झाली. शासनाने तटस्थ भूमिका घेणे योग्य नाही. तेजी-मंदी आर्थिक ,सामाजिक बदल मान्य करून राज्यकर्त्यांनी पुढाकार घेतला . व भांडवलशाही देशांनी हस्तक्षेप नीतीचा त्याग केला म्हणून लॉर्ड केन्स सारख्या विचारवंताने या विचाराचा पुरस्कार केला म्हणजे असे मत व्यक्त केले.रशियात यशस्वी ठरलेल्या तंत्राचे पडसाद जगभर पडले. त्यामुळेच भारताला स्वातंत्र्यलढ्यात नियोजीत पद्धतीने आर्थिक विकासाची स्वरदेशी बाजू होती . स्वातंत्र्यानंतर भारतात अनेक समस्या उदा. दारिद्र्य, बेकारी या समस्या रचनात्मक असो किंवा चुकीची असो खऱ्या अर्थाने अनेक लोक अक्षरशत्रू होते. तंत्रज्ञान व विकास याविषयी लोक अनभिज्ञ होते .व अकुशल होते. तेव्हा देशाचा मुख्य उद्योग शेती होता पण ती शेती मागासलेली ,वाढ खुंटलेली होती. जमीनदारी ,मालगुजारी यांनी जर्जर झाली होती . आणि देशाची प्रगती ,औद्योगिक प्रगती नाममात्र असल्याने आणि समाजव्यवस्थेच्या परिणामाचे चटके शेतीव्यवसायास व जनमानसास बसले होते .तसेच खेड्यातील हस्त उद्योग संपुष्टात आले होते .ही परिस्थिती बदलावयाची असेल तर आर्थिक समृद्धी आणावयाची असेल तर समाजातील विषमता कमी करावयाची सामाजिक ,आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित करायचा असेल, तर नियोजना शिवाय पर्याय नाही. हे समाजवादी नियोजनाने पटवून दिले होते. परंतु स्वतंत्र विचारी समाज निर्माण करावयाचा असेल तर भांडवलशाही समाजात लोकशाहीची मुळे आणि मूल्य जोपासणे आवश्यक आहे. भांडवलशाही समाजवाद विचार प्रणालीतील चांगल्या गोष्टी अंगिकारण्याचा प्रयत्न लोकशाही, समाजवादात झाला पाहिजे. कारण लोकशाही समाजवादी समाजात गर्भश्रीमंत वर्ग दुसऱ्याची किंवा सामान्यांचे शोषण करू शकणार नाहीत. आणि त्यांचे राहणीमान उच्च राहील ,सर्वांना स्वातंत्र्य मिळेल, आपल्या संस्कृतीचा विकास करण्याचा अधिकार तसेच विकासाच्या संधी उपलब्ध होतील, दारिद्र्य ,उत्पन्न आणि संपत्ती याची विषम वाटणी यासारख्या घटकाचे ध्येय प्रत्यक्षात उतरणारे अडथळे लोकशाही मूल्यांच्या द्वारे दूर करता येतील. समाजाचे समतेचे चित्र साकारता येईल. यादृष्टीने नियोजन करणाऱ्या कार्यात गुंतलेल्या समाजवादी व लोकशाही कल्पनांचा मेळ घालणे म्हणजेच तारेवरची कसरत होती. परंतु भारतीय विचारवंतांनी या समतेचा मार्ग अनुसरण्याचे ठरवले. लोकशाही समाजवाद आणावयाचा असेल तर नियोजनबद्ध सामाजिक व आर्थिक क्षेत्रात बदल घडवून आणण्याचा मार्ग, दिशा ठरवली पाहिजे उद्दिष्टे ठरवली पाहिजेत. पण देशात लोकशाही समाजवादी समाज निर्माण करण्याची घोषणा ही दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला झाली त्याबरोबर समाजवादी पद्धतीची समाजरचना आणण्याचे धोरण कॉंग्रेसच्या 1955 सालच्या "आवडी" अधिवेशनात निश्चित झाले पुढे 1964 झाली भुवनेश्वर येथील अधिवेशन लोकशाही समाजवादाचा प्रथम उल्लेख झाला. समाजवाद आणि समाजवादी रचना या दोन्ही गोष्टीत फरक काहीच नाही


Copyright © 2020 Authors

असे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आधीच स्पष्ट केले होते. त्यांच्या मते, "समाजवादी रचना म्हणजेच समाजवाद होता लोकशाही पद्धतीनेच तो आणायचा असे जाहीर झाले"

. परंतु या आधीच्या अठरा वर्षातील काँग्रेस सरकारची धोरणे या नव्याने घोषित झालेल्या धोरणाशी विसंगत नव्हतीच उदा. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आखाड्यात 'समाजवादी' उद्दिष्टाच्या उल्लेख कुठेही नाही. भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यकारभाराच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. ती डोळ्यापुढे ठेवूनच नियोजन आराखडा आखला गेला. परंतु पुढच्या काळात समाजवादाच्या धोरणा मध्ये बदल होऊन पहिल्या पंचवार्षिक योजनेतील मूलभूत विचारसूत्रे पुढील कोणत्याही योजना प्रबंधात फारशी बदललेली दिसत नाहीत .किंबहुना बदलावी लागलीच नाहीत.

*लोकशाही समाजवादाची उद्दिष्टे:

" लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांकडून चालवले गेलेले राज्य म्हणजे लोकशाही होय."

या लोकशाही समाजवादाचा केवळ भौतिक संपन्नता बसत नाही. मानवी जीवन भौतिक दृष्टीने संपन्न व्हावेच पण त्याशिवाय मानवाची वैयक्तिक आणि सामूहिक जीवनही नैतिक ,आध्यात्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही समृद्ध व्हावे या गोष्टीचाही समावेश होतो. या दृष्टीने लोकशाही समाजवादाची पुढीलप्रमाणे उद्दिष्टे आहेत.

(१) दारिद्र्य निर्मूलन

(२) संपत्ती आणि मालमत्ता

(३) समाजवादी संरचनेत सर्वांना समान संधी

(४) मिश्र अर्थव्यवस्था

(५) आर्थिक सत्ता व शक्ती

(६) समाजवादी अर्थव्यवस्थेतील आर्थिक निर्णय

(७) लोकशाही समाजवाद वैयक्तिक व सामूहिक जीवन

 Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-1 No. 3 January–December 2020

अशाप्रकारे लोकशाही व समाजवादी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून भारतीय शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून विकास संकल्पना राबविल्या जातात आणि पंचवार्षिक योजनेच्या द्वारे देशाचा विकास साधण्याचा प्रयत्न आजपर्यंत झालेला आहे म्हणून कोणत्याही देशाच्या विकासामध्ये भांडवलवादी संकल्पना विकासासाठी अनुकूल ठरत नाही तर लोकशाही आणि समाजवादी नियोजनच त्या देशाच्या विकासाला जागतिक पातळीवर नावारुपाला आणण्यासाठी योगदान देत असते त्यामुळे लोकशाही पद्धतीने सर्वांगीण विकास साधता येतो..


Copyright © 2020 Authors